# प्रकरण सहावे -

# निष्कर्ष

# प्रकरण सहावे -

## • निष्कर्ष •

प्रस्तुत पी.एच.डी. शोध प्रबंधात "आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीतील स्त्री - स्वांतत्र्याचा प्रश्न - एक राजकिय अभ्यास" करण्यात आलेला आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये सामाजिक सुधारणा चळवळीत संस्थात्मक चळवळी व सुधारक यांचे योगदान लाभले. जातीभेद, लिंगभेद, धर्माचा प्रभाव, उच्चवर्णीयांच्या हाती सत्ता या गोष्टी समाज व्यवस्थेत अग्रेसर होत्या. स्त्रियांची स्थिती हालाखीची होती. ब्रिटीशांच्या उदारमतवादी विचारांचा प्रभाव 19 व्या शतकातील समाज सुधारकांवर पडला होता. महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेला नवीन दिशा देण्याचे कार्य समाज सुधारकांनी सामाजिक चळवळीमार्फ़त केले. या सामाजिक सुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारणेला लोकहितवादी, महात्मा फुले, आगरकर, न्या. रानडे इ. सुधारकांनी महत्वपूर्ण मानले. विशेष करुन 1850 ते 1920 या काळात ब्रिटीश शासनाचा आधार घेवून अधिक घटनात्मक मार्गाने स्त्री-सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. वसाहतकाळातील मिशन-यांच्यां विधायक कार्याचा आदर्श घेवून सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. भाषणे, लेख, ब्राम्हो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज इत्यादीव्दारे स्त्री प्रश्न व सामाजिक प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न झाला. स्त्री-शिक्षण, बाल विवाह, बाला जरठ विवाह, सतीची चाल, वैधव्य, केशवपन इ. सारख्या स्त्री प्रश्नांवर भर देवून सुधारणा करण्याचा प्रयत्न झालेला आढळतो. त्या काळातील सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे, काशिबाई कानिटकर, डॉ. कृष्णाबाई केळवकर, बयाबाई कर्वे, इत्यादी सारख्या स्त्रियांनीही स्त्री-प्रश्न हाताळण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो. सेवा सदन, शारदा सदन, स्त्री-मुक्ती मिशन, हिंदू लेडीज क्लब, स्त्री विचारवती सभा इत्यादी मार्फ़त आपले कार्य प्रभावीपणे

सुरु ठेवले होते. 19 व्या शतकात सामाजिक सुधारणा चळवळीमार्फ़त सुधारक व स्त्री सुधारकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे स्त्री प्रश्नांना वाचा फ़ोडली व स्त्री स्वांतत्र्याची खरी सुरुवात करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटीशकालीन सामाजिक सुधारणा चळवळीतील समाज सुधारक व स्त्री सुधारकांचे स्त्री स्वांतत्र्य विषयक प्रयत्न तपासून त्याचा स्त्री प्रगतीसाठी किती उपयोग झाला हे समजावून घेण्यासाठी प्रस्तुतचे संशोधन केले आहे.

भारतीय संस्कृती, तिच्या रूढी, प्रथा परंपरा समाजात विविध कालखंडात रूजत गेल्या. स्त्रियांच्या स्थानात बदल होत गेले. भारतात वेगवेगळ्या काळात स्त्री प्रश्न हातळण्याचा प्रयत्न झाला. १९ व्या शतकापर्यंत संस्कृती आणि रूढीच्या गर्तेत स्त्रीवर्ग जखडलेला होता. मात्र ब्रिटीशांच्या आगमनानंतर उदारमतवादी सुधारणेचे वारे भारतात आले आणि ब्रिटीश वसाहत काळात भारतीय संस्कृतीवर परिणाम घडून येवू लागला. या मुदयांचा अभ्यास पहिल्या प्रकरणा-मध्ये केलेला आहे.

भारतातील विविध प्रातांत स्वातंत्र्यपुर्व काळात विशेषत: १९ व्या शतकात सुधारणा जोर धरू लागल्या. महाराष्ट्रातही विविध समाजामार्फत सुधारणा चळवळी घडवून आणल्या गेल्या. या सर्व समाजांचा, संस्थात्मक चळवळींचा उद्देश हिंदू धर्मातील अनिष्ट गोष्टी टाळणे व नव्या सुधारणा घडवून आणणे हा असलेला दिसतो. या सुधारणा चळवळींचा परामर्श दुसऱ्या प्रकरणामध्ये घेण्यात आलेला आहे.

१९ व्या शतकात घडलेल्या सत्तांतराच्या घटनेचा परिणाम स्त्री जीवनावरही झाला. स्त्री सुधारणेचे महत्वाचे १८५० ते १८८० आणि १८८० ते १९२० हे दोन टप्पे आढळतात. १८५० ते १८८० च्या कालखंडात स्त्री विषयक सुधारणेचे विचार निर्माण झाले. १८८० ते १९२० च्या काळात स्त्रियांकडून स्त्री सुधारणेच्या कार्याला प्रत्यक्ष सुरूवात झाली. या सर्व गोष्टीचा उहापोह तिसऱ्या प्रकरणात करण्यात आलेला आहे.

१९ व्या शतकात महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी समाजिक सुधारणांतर्गत. स्त्री सुधारणेमध्ये विशेष कार्य केले. त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कार्यातून, त्यांच्या विविध लिखानातून व चर्चेतून स्त्रीशिक्षण, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, संमत्ती विवाह इ. स्त्री विषयक समस्या सोडविण्याचा प्रयत्न झाला. शिवाय महाराष्ट्रात समाजसुधारणांसाठी संस्था स्थापण्यात आल्या व त्यामार्फत समाजसुधारकांकडून स्त्री सुधारणेची कार्ये केली गेली. या सर्व बाबींची सविस्तर चर्चा प्रस्तुत चौथ्या प्रकरणात केलेली आहे.

महाराष्ट्रातील स्त्री सुधारणा चळवळीत बऱ्याच स्त्रियांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. स्त्री सुधारणा व कार्यासाठी संस्थांची निर्मिती केली. त्यामार्फत आपले स्त्री विषयक कार्य पार पाडले. प्रत्यक्ष कार्याबरोबर लिखानाच्या माध्यमातूनही स्त्री सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. स्त्री मुक्तीविषयक मते स्त्री प्रश्नावरील नाटके, लेख, चर्चा, प्रतिक्रिया यातून मांडली. स्त्री सुधारकांनी मांडलेले विचार व कार्य यांचा आढावा पाचव्या प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

19 व्या शतकापासून समाज सुधारणा व धर्म सुधारणेची जी चळवळ सुरु आहे त्यात समाज सुधारकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. स्त्री - शिक्षण, शुद्रातिशुद्रांचे शिक्षण, विधवा विवाहास प्रोत्साहन, जातीभेदाचे खंडन, अस्पृश्यता निर्मुलन, बालहत्त्या प्रतिबंध, अंधश्रध्दा, वाईट प्रथा परंपरा यावर हल्ला करणे हे सुधारकांचे महत्वपूर्ण कार्य होते. एकुणच सुधारकांनी परंपरेला कवटाळून धरणा-या समाज व्यवस्थेविरुध्द आवाज उठवून विरोध दर्शविला आहे. तत्कालीन समाजाची स्थिती लक्षात घेता पुरुषप्रधान संस्कृती जबरदस्त असूनही त्या काळात त्यांनी दाखविलेले धाडस हे असामान्यच आहे. सुधारकांनी मांडलेले स्त्री - मुक्ती संदर्भातील विचार व कार्य हे त्या काळात महत्वपूर्ण ठरले आहेत. 20 व्या शतकाच्या सुरुवातीला (1920 नंतर ) महात्मा गांधीच्या हाती सुत्रे जाताच त्यांनी घडवून आणलेल्या जन आंदोलनात स्त्रियांनी प्रथमच भाग घेतलेला

आढळतो. पूर्वीच्या मानाने महिला चळवळीचे एक पाऊल गांधीजीच्या काळात पुढे पडले. स्वातंत्र्योत्तर काळात आंबेडकरांनी तयार केलेले हिंदू कोड विधेयक वरिष्ठ पुढा-यांच्या विरोधामुळे अनेक वर्षे पडून राहिले व नंतर कसेबसे आंमलात आले. आंबेडकरांनी स्त्री - स्वातत्र्यांचा पुरस्कार करुन स्त्रीशिक्षणावर प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे भर दिला. वेगवेगळ्या कालखंडात समाजात विविध बदल होत गेले तरी स्त्री पूर्णपणे मुक्त झाली नाही. 21 व्या शतकात भारतीय स्त्रियांची स्थिती आजही गंभीर स्वरुपाची असलेली दिसते. हुंड्यासाठी मारहाण, शारिरीक आघात आजच्या स्त्रीलाही सोसावे लागतात. घटस्फ़ोटीत, विभक्त, परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न , स्त्री शरीर विक्रेत्या वेश्यांचा प्रश्न, प्रौढ - कुमारी, कुमारी माता, बलात्कारीत स्त्रिया, शारिरीक व्यंग, कुंडली, वरा बद्दलच्या अपेक्षा, स्त्री - गर्भाची हत्या अशा सारखे स्त्रियांशी निगडीत प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झालेले आढळतात. आजही विधवांना स्विकारण्याची तयारी समाजात कमी प्रमाणात दिसते. समाजातील काही भागात बालविवाह अजूनही होतात. आजही सती जाणा-या स्त्रियांची उदाहरणे आढळतात. गर्भपात स्त्री - अपत्यांचे प्रमाण जास्त असलेले आढळते.

मंजुश्री सारडा, पुजा सेठी यासारख्या स्त्रियांना हुंड्यासाठी बळी जावे लागले. राजस्थानमधील रुपकंवर या स्त्रीला जबरदस्तीने सती जाण्यास भाग पाडून ती स्वखुषीने सती गेल्याचे भासविले. राजस्थानात भंवरी देवीवर पाच निर्दयी पुरुषांनी बलात्कार केला. तिला न्याय तर मिळालाच नाही. मात्र बलात्कार करणा-यांच्या पाशवी कृतीचे समर्थन राजस्थानच्या उच्च न्यायालयाने केलेले दिसते. अशा प्रकारच्या अन्याय अत्याचाराना समाजातील स्त्रियाना आजही बळी पडावे लागते.

आजची ही स्त्रियांची स्थिती आहे. 1975 नंतर महाराष्ट्रात विविध संघटनामधून स्त्री चळवळ उभी राहिली आहे. स्त्रियांच्या अत्याचाराच्या प्रश्नांबाबत स्त्री चळवळी आवाज उठवित आहेत. स्त्रियांचे कायदेशीर आणि घटनात्मक हक्क या अंतर्गत वारस

व संपत्तीचे हक्क, पोटगी, हुंडा, सती, जुबानी तलाक, देवदासी या सारख्या अनिष्ठ रुढींच्या विरोधात संघटना कार्य करु लागल्या आहेत. मात्र स्वांतत्र्योत्तर काळात राजकिय क्षेत्रात स्त्रियांची स्थिती अजूनही दयनीय दिसून येते. 33 टक्के आरक्षणही त्यांना मिळू दिले जात नाही. म्हणजेच राजकिय कृतीमध्ये स्त्री - चळवळ कमी पडत आहे असे वाटते. सामाजिक व राजकिय क्षेत्रात आपले स्थान बळकट करण्यासाठी विविध स्त्री - अभ्यास केंद्र व स्त्री संघटना या मजबूत करणे व त्यांना दिशादर्शन करणे गरजेचे आहे.

1850 ते 1920 या काळातील महाराष्ट्रातील एकूण स्त्री - सुधारणा चळवळीचा अभ्यास केला असता निरीक्षणाअंती असे आढळते की -

19 व्या शतकात पाश्चिमात्य संस्कृतीचा व विचारांचा प्रभाव काही सुशिक्षीत तरुण पिढीवर पडला व उदारमतवादी विचारसरणी अस्तित्वात आली.

समाजसुधारकांना सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी धार्मिक सुधारणा महत्वाच्या वाटत होत्या. मात्र धर्माची चौकट न मोडता सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला व धर्म सुधारणांवरही भर दिला.

या काळातील बहुतेक सुधारक मवाळ व उदारमतवादी विचार सरणीचे असलेले आढळतात. सामाजिक सुधारणांसाठी सुधारकांनी ज्ञान प्रसारावर अधिक जोर दिलेला आढळतो.

व्याख्यानाव्दारे, लिखाणाव्दारे सामाजिक जागृती घडवून आणणारा व प्रत्यक्ष कृती करण्यासाठी धडपडणारा, कर्ते सुधारक व बोलके सुधारक असे दोन गट आढळतात.

ब्रिटीश शासनाच्या मदतीने स्त्री सुधारणेला चालना देण्यासाठी सुधारकांनी कायद्याची निर्मिती घडवून आणली. मात्र समाजात कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यामध्ये सुधारकांचे प्रयत्न अपुरे पडलेले आढळतात.

सामाजिक सुधारणा म्हणजे अस्तित्वात असलेल्या सामाजिक व्यवस्थेत नवीन मुल्ये आणि विचारांची भर टाकणे असा दृष्टीकोन समाज सुधारकांचा होता. सुधारकांनी

यासाठी ब्रिटीश शासनाचा आधार घेऊन स्त्री सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केलेला आढळतो.

19 व्या शतकात ज्या स्त्रिया स्त्री सुधारणेसाठी पुढे आल्या त्यातील बहुतांशी स्त्रियांना घरातील सुधारक वडील, पती, भाऊ किंवा कुटूंबातील सामाजिक सुधारणेचे वातावरण लाभ-लेले आढळते.

सुप्तावस्थेत असलेल्या स्त्रिया 1850 ते 1880 च्या काळात जागृत होऊ लागल्या. जुनी परंपरावादी विचारसरणी व नवी उदारमतवादी विचारसरणी अशा नव्या - जुन्या संघर्षाचा हा काळ होता.

1880 ते 1900 या काळात शिक्षण क्षेत्रात स्त्रियांची विशेष प्रगती झालेली आढळते. मराठी नियतकालिके, मासिके, पत्रके इ. मधून तत्कालीन स्त्रियांनी लेखनाची सुरुवात केली व लेखक, संपादक अशा टप्प्याने प्रवास केल्याचे आढळते.

1900 ते 1920 या काळात स्त्रियांनी संस्था व संघटना स्थापन करुन स्त्री सुधारणाविषयी आपली बौध्दीक क्षमता सिध्द केल्याचे आढळते.

महात्मा फुले, लोकहितवादी व आगरकर यांच्या मृत्यूनंतर सामाजिक सुधारणेच्या कार्याला कमी महत्व प्राप्त झाले व सामाजिक सुधारणेची गती मंदावलेली जाणवते.

सामाजिक सुधारणा चळवळीतील सुधारकांचे एकूण विचार व कार्य पहाता त्या काळातील त्यांची स्त्री - प्रश्नांची भूमिका आजही महत्वपूर्ण असलेली दिसून येते. त्यांनी धर्म, जातीनुसार नव्हे तर संपूर्ण समाजात स्त्रीचे कसे शोषण होते याचे विश्लेषण केले. तत्कालीन सुधारकांच्या स्त्री विकास सुधारणेच्या प्रयत्नाने आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुढे जावू शकली. आजच्या काळातही स्त्री विषयक दृष्टीकोन बदलण्यासाठी सुधारकांच्या असामान्य कार्यामुळे त्यांच्या स्त्री विषयक दृष्टीकोनाचा अभ्यास मोठ्या प्रमाणात होण्याची गरज भासत आहे. आजच्या स्त्री समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी 19 व्या शतकातील सुधारकांचे विचार, स्त्री संघटना व स्त्रीअभ्यास केंद्राना दिशादर्शन करणारे

ठरतात. 100 वर्षाच्या कालानंतरही सामाजिक सुधारणा चळवळीतील सुधारकांच्या स्त्री सुधारणा विचारांची आवश्यकता व उपयुक्तता पटते. त्यामुळे त्यांचे विचार आजही प्रस्तूत आहेत.

# संदर्भ सूची

## प्राथमिक साधने (पुस्तके व ग्रंथ)


1) आठवले पार्वतीबाई - माझी कहाणी, अनाथ बालिकाश्रम मंडळी, हिंगणे (पुणे )व्दीतीयावृत्ती 1936

2) कर्वे आनंदीबाई - माझे पुराण, के.भि. ढवळे प्रकाशन मुंबई, 1944

3) कानिटकर काशिबाई - श्रीमती काशिबाई कानिटकर आत्मचरित्र, संपादन चरित्र लेखन : सरोजिनी वैद्य, पॉप्युलर प्रकाशन मुंबई 1980.

4) चिपळूणकर विष्णुशास्त्री - निबंध माला खंड - 1 वरदा पुणे, 1993

5) चिपळूणकर विष्णुशास्त्री - निबंध माला खंड - 2 वरदा पुणे. 1993

6) टिळक लक्ष्मीबाई - स्मृतीचित्रे, वरदा बुक्स डेपो, दुसरी आवृत्ती, जाने. 1989

7) पदमनजी बाबा - अरुणोदय , बॉम्बे टॅक्ट ॲन्ड बुक सोसायटी, मुंबई व्दितीयावृत्ती पुनर्मुद्रण 1955

8) पदमनजी बाबा - यमुना पर्यटन, स्नेह वर्धन प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती 1994

9) पंडिता रमाबाई - स्त्री धर्मनिती, रमाबाई मुक्ती मिशन केडगांव, तीसरी आवृत्ती 1967

10) पंडिता रमाबाई - माझी साक्ष , रमाबाई मुक्ती मिशन केडगांव, चौथी आवृत्ती 1999

11) रानडे रमाबाई - आमच्या आयुष्यातील काही आठवणी, मनोरंजन ग्रंथ प्रसारक मंडळ, मुंबई, व्दितीयावृत्ती 1910

12) लठ्ठे आ.बा. - श्री छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, प्रकाशक बा. ल. पाटील, कोल्हापूर 1925

13) शिंदे ताराबाई - स्त्री पुरुष तुलना, रघुवंशी प्रकाशन, पुणे.

14) शिंदे विठ्ठल रामजी - धर्म जीवन व तत्वज्ञान, महाराष्ट्र शासन मुंबई 1979

15) Bhandarkar R.G. - Collected Works of Sir. R.G. Bhandarkar, Vol I & II, N.B. Utagikar, ( Ed ) Bhandarkar Oriented Research Institute, Puna –1928


(अ) दुय्यम साधने (पुस्तके व ग्रंथ)


1) आहुजा राम - भारतीय सामाजिक व्यवस्था, रावत पब्लिकेशन्स, नई दिल्ली, प्रथमावृत्ती 1995

2) आळतेकर मा.दा. - संपूर्ण आगरकर भाग -2 ( पुर्वाध ) मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे 1947.

3) कर्नाटकी श्री. ना. - गुरुवर्य डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे चरित्र, श्री. ना.कर्नाटकी प्रकाशन पुणे, 1927

4) कर्वे स्वाती - स्त्रीविकासाच्या पाऊल खुणा, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती- 2003

5) क-हाडकर के.सी. - बाबा पदमनजी : काल व कर्तृत्व, साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, महाराष्ट्र राज्य मुंबई, प्रथमावृत्ती 1979.

6) कांबळे उत्तम - राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती, सुगावा प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती 2003

7) किर धनंजय - महात्मा जोतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन मुंबई चौथी आवृत्ती 1992

8) कुलकर्णी प्रसाद - सुधारकाग्रणी गो.ग. आगरकर, प्रबोधन प्रकाशनज्योती इचलकरंजी 1995

9) कुलकर्णी प्रसाद - स्त्रीविषयक दृष्टीकोन आणि संत कवयित्री, प्रबोधन प्रकाशनज्योती, इचलकरंजी मे- 1999.

10) केसकर बी.बी. - डॉ. काशिनाथ नवरंगे :चरित्र व मते, के.भि. ढवळे प्रकाशन, मुंबई 1948

11) कुंभार नागोराव (संपादक) - सामाजिक चळवळी काल, आज व उद्या, प्रबोधन प्रकाशन लातूर, प्रथमावृत्ती- डिसे. 1994

12) केळकर द. के. - संस्कृती संगम, मनोहर ग्रंथमाला पुणे 1940.

13) खानोलकर गं.दे.(संपादक) - एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, साहित्य सहकार संघ लि. मुंबई 1975

14) गर्गे स. मा. ( संपादक ) - समाज सुधारक आणि अंधश्रध्दा, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, डोबिवळी (पश्चिम ) चौथी आवृत्ती 2003.

15) गर्गे स.मा. ( संपादक ) - भारतीय समाज विज्ञान कोश खंड - 1, समाज विज्ञान मंडळ पुणे.
पहिली आवृत्ती 1986

16) गर्गे स. मा. ( संपादक ) - भारतीय समाज विज्ञान कोश, खंड -3, समाज विज्ञान मंडळ पुणे, पहिलीआवृत्ती 1989

17) गर्गे स.मा.( संपादक ) - भारतीय समाज विज्ञान कोश, खंड -4, समाज विज्ञान मंडळ पुणे

18) गाठाळ साहेबराव - आधुनिक भारत ( इ.स. 1818 ते 1975 ) कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद,प्रथमावृत्ती जुलै 1998

19) गोरेगावकर गुलाब वसंत ( लेखन व संपादन ) - आर्य महिला समाज : शतकाची वाटचाल ( 1882 ते 1982), आर्य महिला समाज मुंबई, 1982

20) जावडेकर शं. स. - आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुणे, व्दितीयावृत्ती 1953

21) जोगळेकर मृणालिनी - स्त्री अस्मितेचा अविष्कार, एकोणिसावे शतक, भाग - 1, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती 1991

22) जोगळेकर मृणालिनी - स्त्री अस्मितेचा अविष्कार, एकोणिसावे शतक, भाग - 2, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती 1991

23) जोगळेकर मृणालिनी - स्त्री मुक्तीच्या उद्‌गात्या : सुमन लेहरे - स्वाती प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती - 1998

24) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री -भारतीय संस्कृती, प्रबोधन प्रकाशनज्योती, इचलकरंजी, 1992

25) टिळक देवदत्त नारायण - महाराष्ट्राची तेजस्विनी, पंडिता रमाबाई, नागरिक प्रकाशन नाशिक, 1960

26) टोपे त्र्यंबक कृष्णरावा - न्या. महादेव गोंविद रानडे, व्यक्ति आणि कर्तृत्व रोहीत प्रकाशन पुणे 1992

27) ठोके मो. नी. ( संपादक) - रा. ना. चव्हाण निवडक वाङ्:मय पारख प्रकाशन बेळगांव, डिसे. 1983

28) ढेरे अरुणा - विस्मृती चित्रे, श्रीविद्या प्रकाशन पुणे व्दितीयावृत्ती 2001

29) देशपांडे शारदा - धर्म, संत आणि स्त्री, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे पहिली आवृत्ती जून 1999

30) देशपांडे सुनंदा - गो.ग. आगरकर, श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती,1983

31) नरके हरी - महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन, मुंबई प्रथम आवृत्ती 2006

32) पवार गो.मा.( संपादक ) - विठ्ठल रामजी शिंदे यांची रोजनिशी, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, 1989.

33) पानसे वेणुबाई - प्रगती पथावर : हायस्कूल फ़ॉर इंडियन गर्ल्स्, हुजूर पागा, सुवर्ण महोत्सव स्मारक ग्रंथ, पुणे 1934

34) पाटील शोभा - स्त्रियांची आत्मचरित्रे : स्त्रीवादी शोध, मल्हार प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती 2002

35) पाटील पंढरीनाथ - महात्मा फ़ुले यांच्या अप्रकाशित आठवणी, रघुवंशी प्रकाशन पुणे.

36) पंडित श्री.स. - विष्णुपरशुराम शास्त्री यांचे चरित्रे, प्रकाशक विधवा विवाह मंडळ पुणे. 1936

37) पंडित नलीनी - जातीयवाद व वर्गवाद, लोक वाङःमय गृह मुंबई, तीसरी आवृत्ती, 1996

38) प्रधान ग. प्र.( संपादक ) - आगरकर लेखसंग्रह, साहित्य आकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, प्रथमाआवृत्ती 1960

39) प्रियोळकर अ.का. (संपादक)- लोकहितवादी कृत निबंध संग्रह - पॉप्युलर प्रकाशन मुंबई व्दितीया वृत्ती 1967

40) फ़डके य.दी. - 20 व्या शतकातील महाराष्ट्रा ( 1901 ते 1914 )
- खंड 1 ला, श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1989

41) फ़डकुले निर्मलकुमार - महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंई 2004

42) बकाणे छाया सुरेश - विष्णुशास्त्री चिपळुणकर : महाराष्ट्रातील परंपरावादी व जहाल वादी विचार सरणीचे जनक, श्री विद्या प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती - 1999

43) बाबर सरोजिनी - स्त्री शिक्षणाची वाटचाल,महाराष्ट्र राज्य शिक्षण संचलनालय, मुंबई, 1968

44) बेडेकर दि. के.,भनगे भा.शं. (संपादक) - भारतीय प्रबोधनः समिक्षण व चिकित्सा, समाज प्रबोधन संस्था पुणे , प्रथमावृत्ती 1973

45) भगत रा.तु. - महात्मा जोतिराव ते कर्मवीर भाऊराव - युनिव्हर्सल पब्लिकेशन्स कोल्हापूर, प्रथमावृत्ती 1973

46) भोळे भा. ल. - अधुनिक भारतातील राजकिय विचार, पिपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जून 2003

47) भागवत विद्युत, जोशी ललिता- जिजीविषा स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास : एकोणिसावे शतक, स्त्री अभ्यास केंद्र समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, मार्च 1996

48) भागवत विद्युत - महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने, स्त्री अभ्यास केंद्र, समाज शास्त्र विभाग पुणे विद्यापीठ

49) भागवत विद्युत - स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती मार्च 2004

50) भिडे जी. एल., पाटील एन. डी - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फ़डके प्रकाशन कोल्हापूर. सहावी आवृत्ती 1999

51) माटे श्री.म. - कर्तबगार स्त्रिया, कॉन्टीनेंटल बुक सर्व्हिस पुणे 1957

52) मालशे स.गं, आपटे नंदा - विधवा विवाह चळवळ, श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई.

53) मालशे स.गं. ( संपादक ) - कै. ताराबाई शिंदे कृत स्त्री पुरुष तुलना, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई 1975

54) मालशे स.गं.,किर धनंजय (संपादक) - महात्मा फुले : समग्र वाङःमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई 1969

55) माळवी नूतन - लेकी भूमिच्या, कॅन्डीड प्रकाशन वर्धा, प्रथमावृत्ती 2003

56) माळवी नूतन - सावित्रीबाई फुले कॅन्डीड प्रकाशन वर्धा, प्रथमावृत्ती 2004

57) माळी मा. गो. - क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले, आशा प्रकाशन, गारगोटी.व्दीतीय आवृत्ती 1981

58) माळी मा.गो. - सावित्रीबाई फुले काळ कर्तृत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई दुसरी आवृत्ती जुलै 2007

59) मिलके इंदिरा -सर्मपिता, प्रेरणा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 2004

60) मोटे ह.वि.(संपादक) - विश्रब्ध शारदा, खंड - 1, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती 1972

61) रानडे गो.मो. - महात्मा जोतीबा फुले, मंगल प्रकाशन नागपूर, व्दितीयावृत्ती 1991

62) रानडे प्रतिभा - स्त्री प्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक, पद्मगंधा

प्रकाशन पुणे मार्च 2005

63) वर्दे मोहीनी - डॉ. रखमाबाई : एक आर्त , पॉप्युलर प्रकाशन मुंबई 1982

64) वैद्य व्दा.गो. - प्रार्थना समाजाचा इतिहास, प्रार्थना समाज मुंबई, 1927

65) विध्वांस मा. श्री. - श्रीमती रमाबाई रानडे : व्यक्ती आणि कार्य, मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई 1989

66) शहा मृणालिनी (संपादक) - स्त्रीचा आत्मशोध, स्नेहवर्धन गब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती जून 2000.

67) व्होरा आशाराणी - भारतीय नारी दशा, दिशा, नॅशनल पब्लिशिंग हाऊस.

68) व्होरा राजेंद्र ( संपादक) - अधुनिकता आणि परंपरा, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती - नोव्हेबर. 2000.

69) सरदार गं.बा. - महात्मा फुले : व्यक्तीत्व आणि विचार, ग्रंथाली मुंबई व्दीतीयावृत्ती 1982

70) सहस्त्रबुध्दे पु. ग. (संपादक)- लोकहितवादींची शतपत्रे, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे पाचवी आवृत्ती 1970

71) सहस्त्रबुध्दे पु. ग. - महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टीनेंटल प्रकाशन, विजयानगर पुणे.

72) सहस्त्रबुध्दे द.ल., पंडित श्री. स. - विष्णुपरशुराम पंडित यांचे चरित्र, पुणे 1935

73) सहस्त्रबुध्दे श्री. म., जोशी वि. कृ. ( संपादक ) - दर्पण संग्रह, मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन मुंबई 1946

74) साठे ताराबाई रा. - अपराजिता रमा, प्रकाशक दा.पु. नगरकर, पुणे 1975

75) सावंत अंकुश रा. - मनु स्मृती : एक समालोचन, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई 1996

76) साळुंखे आ.ह. - हिंदू संस्कृती आणि स्त्री , लोक वाङःमय गृह मुंबई, दुसरी आवृत्ती 1993


## (B) Secondary Sources - English Books


1) Chandra Bipin - Modern India ( National Council of Education Research & Trainning .

2) Chaudhari Maitrayee - Indian Womens Movement, Reform & Revival, New Delhi, First Published – 1993

3) Desai A.R. - Social Background of Indian Nationalism : Bombay Popular Prakashan- 1976.

4) Divekar V.D. & Others- Social Reform Movement in India: (Ed.) A Historical Perspective, Popular Prakashan Bombay - 1991

5) Heimasath C. H. - Indian Nationalism & Hindu Social Reform, Princeton University Press, Princeton-1964

6) Kavalekar Kashinath - Non Brahmin Movement in Southern India, 1873 – 1949, Shivaji University Publications – 1979.

7) Lederle Mathew - Philosophical Trends in Modern Maharashtra, Popular Bombay-1976

8) Majumdar, B.B. - Militant Nationalism in India & its Socio – Religious Background, General Printers & Publishers, Calcutta – 1960

9) Majumdar Bimanbehari- History of India : Social & Political Ideas from Ram Mohan to Dayanand, Book land Pvt. Ltd. Calcutta- 1967.

10) Munshi K.M. - The ruin that Britain wrought, Bhartiya Vidya Bhavan, Bombay - 1946.

11) Nanda B. R.(Ed.) - Indian women : From Purdah to Modernity, New Delhi Vikas, 1976

12) Phadke Y.D. - Social Reformers of Maharashtra, Infromation Centre, New Delhi -1975

13) Phadke Y.D. - Women in Maharashtra. Maharashtra Information Centre, Goverment of Maharashtra, New Delhi – 1989

14) Sen S.P.(Ed.) - Social & Religious reform movements in the Nineteenth Century & Twentieth Century, Institute of National Studies, Calcutta , First Published – 1979.

15) Sunthankar B.R. - Maharashtra 1858 to 1920, Popular Book Depot, Bombay – 1993

## (क) लेख व शताब्दी अंक

1) घोटके विजय - पुणे प्रार्थना समाजाची 125 वर्षे दै. सकाळ दि. 13 फेब 1996

2) पाटणेकर विजया - स्त्री मुक्तीची नवी दिशा, दिवाळी अंक 19883)

3) मुक्ती किरण - 1899 ते 1999 चर्च शताब्दी अंक, पंडिता रमाबाई मुक्ती मिशन, केडगांव.

## मासिके

1) महिला अंदोलन पत्रिका, मुंबई.

2) बायझा, पुणे.

3) समाज प्रबोधन पत्रिका, पुणे.

4) प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी.

## (ड) एम.फिल. आणि पीएच. डी.चे अप्रकाशित शोध प्रबंध

1) अपर्सिंगेकर रजनी अनिल - बदलते स्त्री जीवन आणि नाटक, (इ.स.1843 ते 1947), पीएच.डी. पदवी साठी सादर केलेला शोधप्रबंध, मुंबई विद्यापीठ जुलै 2005

2) इंगोले कृ.जी. - मराठी साहित्यातील विधवा जीवनाचे दर्शन, (इ.स. 1818 ते 1920), शिवाजी विद्यापीठास पीएच.डी साठी सादर केलेला अप्रकाशित शोध प्रबंध, ऑगस्ट 1981

3) पाटील विमल के. - मराठी सामाजिक नाटकांनी मांडलेले स्त्रियांचे प्रश्न, (इ.स.1857 ते 1920) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या पीएच.डी ( मराठी ) पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधप्रबंध

4) सुर्वे शिला म. - गोपाळ ग. आगरकर व लोकमान्य टिळक यांच्या स्त्री प्रश्न विषयक भूमिकेची तुलना, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या एम.फ़िल (राज्यशास्त्र) पदवी साठी सादर केलेला अप्रकाशित शोध प्रबंध- 1996

5) उदगांवे सुजाता आ. - महात्मा जोतिबा फुले विचारातील स्त्रीवाद, राज्यशास्त्र विषयातील एम.फ़िल पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास सादर केलेला शोध प्रबंध, जून 1999